



# ज्ञान संजीवनी

अंक - दुसरा १० मे २०२०



# ज्ञानरचनावाद





## दुनिया बोलक्या बाहुल्यांची

करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' या साने गुरुजींच्या ओळी अगदी सार्थ आहेत. विविध अध्ययन अनुभव मुलांना देत असतांना ते आणखी आनंदी उपयुक्त व जिवंत कसे होतील याचा विचार माझ्या मनात आला. लगेच मी बोलक्या बाहुल्यांच्या विषयी विचार करू लागले. या आधी कधी प्रत्यक्ष हा खेळ पाहिलेला नव्हता पण माननीय तिवाडे गुरुजींचे मार्गदर्शन आणि दिवंगत श्री. टेकाडे गुरूजींच्या आशीर्वादाने या बाबीला प्रत्यक्षात आणण्याचा विचार मी केला. सुरुवातीला तिवाडेसरांना मदतनीस म्हणून काम करताना बाहुल्या हाताळण्याचा सराव झाला होता. बाहुल्या तयार करणे हे फार कौशल्याचे काम... खरतर विद्यार्थ्यांचे अवधान अभ्यासात टिकवून ठेवण्यासाठी, मनोरंजनातून विविध बोधपर बाबी समजावण्यासाठी, कलाविषयक रुची वाढवण्यासाठी, सांस्कृतिक कला संवर्धनासाठी, अध्ययन अध्यापनातील रंजकता वाढवण्यासाठी विविधरंगी हलते बोलते बाहुले, संवादातील विषयानुसार कथानकातील विषयाला बाहुल्यांचा वापर, विद्यार्थ्यांची संवेदनशीलता जाणीव दृढ करणारे महत्वाचे माध्यम म्हणजेच बाहुल्या.....

मराठी हिंदी इंग्रजी कार्यानुभव विषयाच्या तासिकांमध्ये विशेष शिबिरांमध्ये, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बाहुल्यांचा सहज वापर आपल्याला करता येतो.

त्याकरिता विविध माध्यमांचा वापर आपल्याला करता येतो त्यापैकी कागदी लगद्याच्याबाहुल्यांची मी निवड केली. लहान मुलांना आवडणारे ससा, एलियन, मुलगी, आई, आजी, बाबा, दादा अशा बाहुल्या तयार करून त्यांना मजेदार नाव सुद्धा दिली. उदा. चिंगी, येडा याकुब,पिंटू, शोनू-मोनू इ. कोणत्याही बाहुली नाट्याचा आत्मा म्हणजे त्याचे कथानक. याकरिता विविध सामाजिक बाबी जसे स्त्री पुरुष समानता, लेक वाचवा देश वाचवा, पर्यावरण संवर्धन, मुलींची सुरक्षितता, शिक्षणाचे महत्त्व, आरोग्यविषयक जनजागृती याविषयी कथानक तयार केले. वारंवार येणाऱ्या सामाजिक विषयांचा व शैक्षणिक बाबीतील अडचणींचा समावेश या कथानकामध्ये केला. त्यामुळे बाहुलीनाट्याचा प्रभाव वाढला. फक्त बाहुल्या व कथानक असून जमत नाही तर त्याकरिता सादरीकरणाचे कौशल्य असणे गरजेचे असते.

याकरिता युनिवर्सल स्पोर्ट्स द्वारा आयोजित अभिनय कार्यशाळेतून नाट्यशास्त्राबाबत माननीय श्री सतीश पावडे सर आणि त्यांच्या चमूकडून धडे घेऊन आवाजातील चढ-उतार, संवाद कौशल्य अवगत करून घेतले. आठ वर्ष काम केल्यावर संधी मिळाली ती सांस्कृतिक आणि प्रशिक्षण केंद्राद्वारे आयोजित शिक्षणामध्ये बाहुलीनाट्याची भूमिका या प्रशिक्षणामध्ये भाग घेण्याची.. बाहुलीनाट्य बाबत माहिती झाली. संस्कृती जोपासण्याची प्रेरणा मिळाली. बाहुलीनाट्य सादर करताना आवश्यक असणारी आणखी एक बाब म्हणजे योग्य आकार, सहज उचलून नेता येईल अशा प्रकारचे स्टेज तयार करणे कारण विविध ठिकाणी कार्यक्रम करताना ते सहज सोयीचे होईल. याकरिता आमचे सन्मित्र श्री अधीर कडू,माझे वडील दिलीप बाभुळकर यांची मोलाची मदत मिळाली व आकर्षक असे स्टेज तयार करता आले. ही सगळी तयारी झाल्यानंतर आता प्रत्यक्ष कार्यवाही ची वेळ आली. आपण बोलक्या बाहुल्यांचा खेळ पाहणार म्हटल्याबरोबर मुलांच्या उत्साहाला उधाण आले. मी बाहुली नाट्याची पार्श्वभूमी सांगितल्यानंतर प्रत्यक्ष कथानकाच्या रूपाने मुलांना एकेक विषय वेगवेगळ्या बाहुल्या समोर येऊन जेव्हा उलगडून दाखवतात तेव्हा त्यांच्या आनंदाला सीमा उरत नाही टाळ्यांचा कडकडाट सोबत गुणगुणता येणार गाणं याद्वारे आपला सहभाग नोंदवतात. प्रत्येक विषयाच्या मध्ये निवेदना करिता काही क्षण वापरून पुन्हा दुसरा खेळ सुरू करता येतो. कार्यक्रमानंतर त्याच्या सादरीकरणाबाबत मुलांशी चर्चा करून बाहुली नाट्यातील बाबींवर प्रकाश टाकण्यात येतो. त्यामुळे मुलांच्या मनातील विचार प्रकट करण्याची संधी त्यांना मिळते. या बाहुलीनाट्य बरोबरच आरोग्य विषयक बाबी मधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे हात धुणे किती आवश्यक आहे याचे प्रात्यक्षिक मुलांकडून करून घेतल्या जाते. ही सवय बिंबवण्यात या प्रयोगाची मनोरंजनातून विज्ञानाद्वारे मदत होते. याशिवाय मनोरंजक गाणी आणि गोष्टी यामुळे मुलांना हा कार्यक्रम संपूच नये असे वाटते. रंजना सोबतच विविध शैक्षणिक बाबी, आरोग्य विषयक चांगल्या सवयी, भौमितिक आकृत्या म्हणी व त्यावर आधारित गोष्टी, पशुपक्ष्यांविषयी माहिती मुलांना सहज देता येते या माध्यमाद्वारे दिलेल्या माहितीचा मुलांना सहजच फायदा होतो. विविध ठिकाणी कार्यक्रम सादर करण्याची संधी मला मिळाली. मुलींची सुरक्षितता.

मीनाराजू मंच' अंतर्गत किशोरवयीन मुलींच्या समस्या बाबत मुलींना फक्त भाषण देऊन थांबण्यापेक्षा बाहुलीनाट्य दाखवून नको असलेला स्पर्श कसा ओळखावा, स्वसंरक्षणाकरिता आपण काय करावे, माझे शरीर व त्याची ओळख, स्व ची जाणीव याबाबत प्रात्यक्षिकासह चर्चा करायची. एक दिवस शिबिरामध्ये मुलींना मी ही माहिती दिली दुपारच्या जेवणाच्या वेळी तीन चार मुलींचा समूह माझ्याजवळ आला. काय करावे व करू नये सांगावे की न सांगावे या मानसिकतेत या होत्या. त्यांना विचारले असता भयानक सत्य बाहेर आले ते म्हणजे तिथे जेवणाकरिता आलेला आचारी मुलींना जेवण घेताना आचकटविचकट बोलून त्रास देत होता. नको तिथे स्पर्श करीत होता. मुलींनी शिबिरात ऐकलेली माहिती ऐकून त्याला विरोध करीत सर्वांसमोर रागवले. ही बाब मला सांगताना त्यांना आनंदच होत होता. अशा अनेक बाबी ज्या त्यांनी आज पर्यंत घरच्यांना सुद्धा सांगितलेल्या नव्हत्या त्या बाबी माझ्या जवळ सर्वांसमोर मुली खुलेआमपणे बोलत होत्या. हा विश्वास मुलींच्या मनात निर्माण करण्याचं काम त्यामुळे झालं. वाढत्या वयामुळे त्यांच्या मनात असलेले पाळी विषयक प्रश्न व इतर शंकासमाधान सुद्धा त्या करून घेत होत्या. हा कार्यक्रम सादर केल्यानंतर एक विद्यार्थिनी माझ्याजवळ आली व चर्चेअंती लक्षात आले किती फार वाईट परिस्थितीला सामोरे जाते आहे पण तिने सांगितले की बाहुलीनाट्य पाहून मला

आता धीर आला आहे मी प्रतिकार करू शकते व तिने ते प्रत्यक्ष करून दाखवल्याचे नंतर सांगितले तेव्हा याची प्रचिती आली की जग बदलू शकतो गरज आहे विश्वास निर्माण करण्याची ....

फक्त मुलीच नव्हेतर महाविद्यालयातील मुलांनी राष्ट्रीय सेवायोजन शिबिरातील कार्यक्रमानंतर कबुल केले की आम्ही मुलींना यापुढे त्रास देणार नाही.

स्वच्छतेचे महत्त्व मुलांना कितीही वेळा सांगितले तरी मुलं जेवणापूर्वी हात धूत नसत. मनात विचार आला की आता काय करावे मग मी मदत घेतली सचिन तेंडुलकर यांची ..लहानपणीचा सचिन ग्राउंड वर क्रिकेट खेळायला जातो. आल्यावर हात पाय न धुताच जेवतो त्याला काही दिवसानंतर कावीळ होतो अशी थीम तयार केली व नंतर प्रत्यक्ष हात धुण्याचे महत्त्व प्रात्यक्षिकातून मुलांसमोर मांडले तर मुले हात धुतल्या शिवाय जेवायचा विचारही मनात आणत नव्हते. एवढेच नव्हे तर स्वच्छता दूत बनवून इतरांपर्यंत हात त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवत होते.हे झालं मुलांच्या बाबतीत पण ज्या पालक माता जेवणापूर्वी, बाळाची शी धुतल्यावर, स्वयंपाक पूर्वी हात धूत नसत, डाव्या हातात अंगठी घालत त्यांनाही आमच्या बाहुल्या बाहुलीनाट्यात मनोरंजनातून समज देत व त्याही हसत हसत कबूल करीत असत... मी आता यानंतर हात नक्कीच धुणार. `

शौचालयाचा वापर व बांधकामाचे महत्त्व आमच्या बाहुल्या विविध ग्रामसभा पालक सभांमधून सांगत असत त्यामुळे ग्रामसेवकाला मदतच होत असून स्वच्छतेचे संदेश मुले व बाहुल्या घरोघरी पोहोचवत. 'सकाळी सकाळी गेले बाई, सापच दिसला मला ग आई मला संडास बांधून हवा' हे गाणे घरोघरी प्रसिद्ध होते. `अमरावती आकाशवाणी 'च्या माध्यमातून जिल्हा परिषद अमरावती द्वारे 'स्वच्छतेचा जागर' या कार्यक्रमात आमच्या बाहुलीनाट्याद्वारे समाज जागृती करिता महत्त्वाचे स्थान दिले. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात स्वच्छतेचे संदेश पोहोचवण्यास मदत झाली. सध्या वारंवार या कार्यक्रमाचे प्रसारण करून जनजागृती करण्यात येत आहे. ज्यांनी हा कार्यक्रम ऐकला ऐकला त्याच्याकडून कार्यक्रमाबाबत खूप चांगला अभिप्रायही देत आहेत.

## शिक्षण वारी

शिक्षणक्षेत्रात `शिक्षण वारीला एक महत्वाचे स्थान आहे.हाअतिशय प्रभावी उपक्रम माननीय श्री विनोद तावडे ,शिक्षण मंत्री ,महाराष्ट्र राज्य यांनी हातात घेतल्यामुळे राज्यातील पन्नास उपक्रमशील शिक्षकांना आपले उपक्रम संपुर्ण राज्यातील शिक्षकांपर्यंत पोहचवता येतात. या वारीमध्ये माझी निवड करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांपर्यंत बाहुल्यांचे विविध प्रकार, अध्यापनात त्यांची मदत कशी घ्यावी सादरीकरणाचे प्रात्यक्षिक करून दाखवता आले. माननीय. नंदकुमार सर, शिक्षण सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते सन्मानित सुद्धा करण्यात आले.मा. धिरज कुमार सर, आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेसह अनेक मान्यवरांनी भेटी देऊन पाहणी केली व कौतुकाची थाप दिली. शिक्षण वारीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रभर माझी बाहुलीनाट्य कलाकार म्हणून एक वेगळी ओळख तयार झाली. यातून विविध शिक्षकांनी प्रेरणा घेत काम करण्यास सुरुवात केली. यात सरला कामे, औरंगाबाद,सोळंके सर, दीपश्री वाणी, शीला मसराम, उर्मिला जमदाडे व अनेक नावे सामील आहेत. बाहुल्यांच्या वापरातील सहजता या निमित्ताने सर्वांसमोर मला मांडता आली. दुसऱ्या वारीत पुणे, औरंगाबाद, नागपूर या शहरातील वारीतून व तिसऱ्या वारीत लातूर, अमरावती या ठिकाणी भेट देणाऱ्या हजारो शिक्षकांपर्यंत बाहुलीनाट्य त्याचे महत्त्व व त्यांचा वापर पाण्याचे महत्व, त्यांचा उपयोग कसा करावा हे मला सांगता आले हा माझा सन्मानच असे मला वाटते.


पश्चिमी क्षेत्रीय कार्यशाळा
सहा राज्यातील प्रतिनिधींसमोर महाराष्ट्र राजाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी पश्चिमी क्षेत्रीय कार्यशाळेत मला मिळाली. यावेळी माननिय. प्रकाश जावडेकर,केंद्रीय शालेय शिक्षणमंत्री, भारत यांचेसह सहा राज्यातील मान्यवरांनी भरपूर प्रतिसाद दिला.

## विद्यार्थ्यांची उपस्थिती

विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्याकरिता मनोरंजनातून शिक्षणाचे महत्व अनन्वित आहे. माझ्या शाळेतील वंचित घटकातील बालकांची उपस्थिती वाढवण्याकरता मला बाहुल्यांची फार मदत झाली. छोट्या छोट्या कारणासाठी गैरहजर राहणारी व मुलं बाहुली सोबत बोलता येतं म्हणून रोज शाळेत येऊ लागली. पालसिंग तर चक्क सांगायचा मी तुमच्यासोबत बोलायला नाही बाहुली सोबत बोलायला शाळेत येतो... आहे ना कमाल.
हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे झालेल्या शारीरिक शिक्षण या विषयावरील पहिल्या जागतिक संमेलनात 28 देशांच्या प्रतिनिधींसमोर व प्रदर्शनीला भेट देणाऱ्या सुमारे 50 हजार लोकांसमोर बाहुली नाट्य सादर करण्याची संधी मिळाली. यातून आरोग्य व शिक्षण यांचे महत्व पटवून देण्यात आले.
कृषी वसंत
नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय कृषी प्रदर्शन शेतकरी आत्महत्या रोखण्याकरिता प्रभावी उपाय, शेतीतील विविध आधुनिक बाबी देशभरातील शेतकऱ्यांसमोर मला मांडता आल्या त्यामुळे देशभरातून आलेले शेतकरी, मान्यवर मंत्री महोदय यांचे समोर सादरीकरणाची संधी मिळाली.
श्री संत अच्युत महाराज यांच्या संस्थानात दरवर्षी बालमहोत्सवात परिसरातील विद्यार्थ्यांसमोर बाहुली नाट्याची संधी मिळते. स्वत: महाराजांनी लहान मुलांप्रमाणे बसून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला होता. आजपर्यंत सुमारे 250पेक्षा जास्त शाळांमध्ये बाहुली नाट्य प्रयोग करून मुलांना अभिव्यक्ती च्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रत्यक्षात मुलांना बाहुल्यांची हाताळण्याची संधी दिली आहे. `जिल्हा` परिषद शिक्षिका असून सुद्धा इंटरनॅशनल स्कूल मधून सुद्धा कार्यक्रमाकरिता बोलावणे येतात.महाराष्ट्रातील पहिल्या बाहुलीनाट्य संमेलनात सहभागी होवुन कला सादर केली. IBN Lokmat ने महिला विशेष दखल घेतली. त्याचे प्रसारण सुमारे 33हजार लोकांनी पाहिल्याचे ट्युबवर दिसते.दीपाली बाभुळकर नावाने मी युटुब चॅनलला विडीयो अपलोड केलेआहेत. तंत्रस्नेही असल्याने मुलांना स्काईप ला विडीयो कॉलच्या माध्यमातून सुद्धा बाहुली नाट्याचा आस्वाद देत आहे.
ज्ञानज्योती उजळूया, स्कूल चले हम या माहितीपटाला बाहुलीनाट्याचा समावेश करण्यात आला आहे. विदर्भातील एकमेव महिला बोलक्या बाहुल्या कलाकार म्हणून मान्यता व प्रसिद्धी सुद्धा मिळाली आहे. मुलांमध्ये व माझ्या मध्ये विश्वासाचे नाते तयार झाले आहे. ही बाहुली नाट्याची सर्वात मोठी यशस्विताच होय. मुलांमध्ये मूल होऊन मला मिसळता येतं, त्यांच्या भावना समजून घेता येतात, समस्या जवळून समजून घेता येतात, त्यांचा मित्र होता येतं, अभ्यासक्रमातील विविध बाबी अगदी सहजपणे मुलांसमोर आनंददायी पद्धतीने पोहोचवता येतात, अगदी कठीण संकल्पना सुद्धा सोप्या पद्धतीने सांगता येतात हे महत्त्वाचं... मुलं आनंदी उत्साही राहिली तर त्यांची ग्रहणक्षमता चांगली होण्यास मदतच होते. अभ्यासाचा ताण झुगारून देऊन अभ्यासाचा आनंद मुलांना व मलाघेता येतो. काही आनंदाचे क्षण मुलांच्या आयुष्यात निर्माण करता येतात ही बाहुली नाट्याची मोठी उपलब्धी. मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद सळसळता उत्साह मलाही त्यांच्यासारखे ताजेतवाने राहण्यास मदत करतो. मला माझ्या या संपुर्ण प्रवासात साथ देणारे माझे

कुटुंबीय आणि मित्रमैत्रिणी, अधिकारीगण चाहत्यांची मी शतशः ऋणी आहे.
प्रसिद्ध शायर निदा फाजली म्हणतात,
घर से मस्जिद बहोत दूर है चलो किसी रोते हुए बच्चे को हसाया जाये
किती सार्थ आहे ना ओळी चला एक आनंदयात्री बनून या दुनियेला पुढे नेऊ या........आनंदाचे डोही आनंद तरंग अनुभवूया.......


**दीपाली दिलीप बाभुळकर**
विषय सहायक
जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था ,अमरावती.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारतळेगाव
पंस. भातकुली
जि. प. अमरावती
deepalibabhulkar@gmail.com
संपर्क क्रमांक 8805410887

# गणित कोपरा

## शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी

### 1 ते 100 संख्यांवरील प्रश्न

1 ते 100 पर्यंतचा उजळणी तक्ता विद्यार्थ्यांच्या समोर ठेवून काही रंजक प्रश्नांचा सराव घेतला असता असे लक्षात आले की पूर्व प्राथमिक किंवा प्राथमिक शाळेतील पहिलीच्या वर्गापासून इयत्ता पाचवी पर्यंतच्या प्रवासात विद्यार्थांनी किती तरी वेळा उजळणी लिहिली व वाचली परंतु तरीही या प्रश्नांची उत्तरे शोधतांना विद्यार्थ्यांची गाळण उडाली .विश्वास नसेल बसत तर आपणही हा प्रयोग करून बघा .विशेष म्हणजे यातील बरेचसे प्रश्न यापूर्वी शिष्यवृत्ती परीक्षा किंवा इतर स्पर्धा परिक्षांमधून विचारलेले दिसून येतात .

**प्रश्न:-**

1) 1 ते 100 मध्ये 3 हा अंक किती वेळा येतो ?
2) 1 ते 100 मध्ये 3 हा अंक असणाऱ्या संख्या किती ?
3) 1ते 100 मध्ये 3 हा अंक नसणाऱ्या संख्या किती ?
4) 1 ते 100 मध्ये 3 हा अंक एकक स्थानी असणाऱ्या संख्या किती ?
5) 1 ते 100 मध्ये 3 हा अंक दशक स्थानी असणाऱ्या संख्या किती ?
6) एकूण दोन अंकी संख्या किती?
7) दोन अंकी संख्यांमध्ये 3 हा अंक किती वेळा येतो?
8) दोन अंकी संख्यांमध्ये 3 हा अंक असणाऱ्या संख्या किती ?
9) दोन अंकी संख्यांमध्ये 3 हा अंक नसणाऱ्या संख्या किती ?
10) 1 ते 100 पर्यंत सर्व मिळून एकूण किती संख्या चिन्हे लागतात ?
11) 1ते 100 मध्ये एकूण मूळसंख्या किती ?
12) 1ते 100 मध्ये एकूण संयुक्त संख्या किती?
13) 1 ते 100 मध्ये जोडमूळ संख्यांच्या किती जोड्या आहेत ?
14) दोन अंकी एकूण मूळसंख्या किती?
15) 1ते100 पर्यंतच्या सर्व संख्यांची बेरीज किती ?
16) 1 ते 100 पर्यंतच्या सम विषम संख्यांच्या बेरजेतील फरक किती ?
17) 1 ते100 मध्ये 3 हा अंक एकक स्थानी असणाऱ्या मूळसंख्या किती ?
18) 1 ते 100 मध्ये 3 हा अंक दशकस्थानी असणाऱ्या मूळसंख्या किती ?
19) 1 ते 100 मध्ये अंकांच्या स्थानांची अदलाबदल करून पुन्हा मूळसंख्याच मिळते अश्या एकूण किती मूळसंख्या आहेत ?
20) 1ते 50 पर्यंतच्या सर्व संख्यांची बेरीज किती?

**टीप :** येथे फक्त '3' या अंकावर प्रश्न काढलेले आहेत .वेगवेगळे अंक वापरून असे कितीतरी प्रश्न तयार करून अधिकचा सराव घेतला आणि या घटकाचे दृढीकरण करून घेतले .

**उत्तरे**

| | | |
|---|---|---|
| 1)20 | 2)19 | 3)81 |
| 4)10 | 5)10 | 6)90 |
| 7)19 | 8) 18 | 9) 72 |
| 10)192 | 11)25 | 12) 74 |
| 13) 8 | 14)21 | 15)5050 |
| 16)50 | 17)7 | 18)2 |
| 19)8 | 20)1275 | |

**सुधाकर रामदास पाटील**
सहशिक्षक
जि .प.शाळा शेलवली (बां)
ता .शहापूर जि .ठाणे
मोबा .7798963063

# गणित कोपरा

## चला गप्पा मारु या!

**आजच्या गप्पाचा विषय कोंणतां?**
**काटकोन त्रिकोण**

काटकोन त्रिकोणाचा उपघटक कोणता?
लहान बाजू विषम संख्येत असेल तर दुसरी बाजू व कर्ण काढणे.

**कोणत्या विषम संख्या घ्याल?**
एक ही विंषम संख्या सोडून कोणतीही विषम संख्या.
3,5,7,9,11——/

**दुसरी बाजू कशी माहित कराल?**
दुसरी बाजू माहित करण्याच्या दोन स्टेप आहेत.

**स्टेप (1)**
एक ही विषम संख्या सोडून कोणतीही विषम संख्या घ्या.
समजा 7 ही विषम संख्या घेतली
विषम संख्येतून 1 वजा करून निमपट करा.
येथे 7-1=6 व 6 ची निमपट =3
स्टेप (1) चे ऊतर = 3

**स्टेप (2)**

प्रथम बाजू विषम संख्या आहे
आपण 7 ही संख्या घेतली.

या संख्येला स्टेप (1) च्या ऊत्तराने गुणून स्टेप (1)चे ऊत्तर मिळवा.
येथे 7*3+3= 24
दुसरी बाजू = 24
तीसरी सर्वात मोठी बाजू म्हंणजे कर्ण कसा काढाल?
दुसरी बाजू +1= कर्णाची लांबी
येथे
24+1=25

**त्रिकूट कसे लिहाल?**
(7,24,25)

**वरील त्रिकूटाचा मसावि किती?**
मसावि=1
हे त्रिकूट कोणत्या नावाने ओळखतात?
पायथॅगोरियन प्रिमीटीव्ह त्रिकूट
आणखी ऊदाहरणे घ्या.

**वेंकट पिलगुलवार सर**
अमेरिका

## निकाल पत्रक एक्सेल फाईल

राज्य शासनाच्या घोषणे नुसार फक्त आकारिक मूल्यमापनाच्या गुणांवर आधारित सत्र 2 चा निकाल बनवा.

खालील लिंक वर फाईल उपलब्ध आहे...

**गुरुमित्र ऍप:**
https://play.google.com/store/apps/details?id=com.gurumitra.lite

**ब्लॉग:**
http://techgurumarathi.blogspot.com/p/templets.html

**सुनील सागरे**
कोल्हापूर

## संगणक जिज्ञासा

**1) सर्व रनिंग प्रोग्राम्स आपण कोठे बघू शकतो ?**
अ. स्टेटस बार
ब. टास्क बार
क. टायटल बार
ड. क्विक लॉंच बार

**2) क्विक लॉंच बार वरून प्रोग्राम रन करण्यास आयकॉन वर काय करावे लागते ?**
अ. दोनदा क्लिक
ब. एकदा क्लिक
क. माऊसचे उजवे बटन क्लिक
ड. वरील सर्व

**3) प्रत्येक विंडोला खालील कुठले बटन असते ?**
अ. मिनीमाईज
ब. मॅक्झिमाईज/रिस्टोअर
क. क्लोज
ड. वरील सर्व

**4) मुख्य विंडोमध्ये उघड्या असलेल्या फाईलचे स्थान कोठे पाहता येते ?**
अ. ऍड्रेस टूल बार
ब. स्टेटस बार
क. मेनू बार
ड. वरील सर्व

**5) मायक्रोसॉफ्टच्या वेबसाईटवरील विविध विभागात कशाच्या साह्याने जाता येईल ?**
अ. मायक्रोसॉफ्ट बार
ब. इंटरनेट बार
क. लिंक्स टूलबार
ड. वरीलपैकी एकही नाही

**6) खालीलपैकी कोणता ई-मेल पत्ता योग्य आहे ?**
अ. www.education.com
ब. education@gmail.com
क. education-net
ड. वरीलपैकी एकही नाही

**7) डावखुऱ्या माणसासाठी माऊसची सेटिंग बदलता येऊ शकते का ?**
अ. होय
ब. नाही

**8) ISP म्हणजे काय ?**
अ. International Serving Protocol
ब. Internet Service Provider
क. Internet Service Protocol
ड. Inter Sorting Protocol

**9) टुलबार वरील प्रत्येक बटन काय दर्शविते ?**
अ. मेनू
ब. सब मेनू
क. कमांड
ड. वरीलपैकी एकही नाही

**10) कंट्रोल + O हि शॉर्टकट की प्रेस केल्यास काय होईल ?**
अ. फाईल बंद होईल
ब. फाईल डिलिट होईल
क. फाईल उघडेल
ड. वरीलपैकी एकही नाही

**उत्तरे :**
1) क
2) ब
3) ड
4) अ
5) क
6) ब
7) अ
8) ब
9) क
10) क

**गणेश चौगुले**
**सातारा**

# माझा उपक्रम

## HANGING LIBRARY WITH TWINNING OF SCHOOL

### “तरंगते वाचनालय”
### ( Hanging Library )

गरज : वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये क्रमिक पुस्तके वाचनाविषयी उत्सुकता, गोडी दिवसेंदिवस कमी झालेली जाणवत होती. कदाचित तीच तीच पुस्तके समोर असल्यामुळे किंवा घरून मोबाईलचा खेळण्यासाठी अति वापर यामुळे सुद्धा वाचन कमी झाले असावे . परंतु याचे परिणाम म्हणजे वाचन नसल्याने त्यांची अभ्यासाची गोडी आणि गुणवत्ता सगळेच कमी होत होते . वाचन कमी म्हणून शब्दसंग्रह कमी परिणामी बोलण्यातला.भाषणातील आत्मविश्वास कमी झालेला जाणवत होता. याचे दूरगामी परिणाम होऊ नये म्हणून मुलांना पुन्हा वाचनाची गोडी लावणे गरजेचे होते.

"गरज ही शोधाची जननी असते" या उक्तीप्रमाणेच विद्यार्थ्यांमधील जाणवत असलेल्या समस्येवर उपाय मला सापडला आणि तो म्हणजे "तरंगते वाचनालय" (Hanging Library ) हा उपक्रम.

कार्यवाही :मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढविण्यासाठी त्यांना त्यांच्या वयानुसार , त्यांच्या आवडीची पुस्तके आणि तीही नेहमीच उपलब्ध करून देणे आवश्यक होते. शालेय वाचनालयातील कपाटात बंदिस्थ असलेली पुस्तके बाहेर काढून ती सर्व पुस्तके एकाच वेळी मुलांसमोर उपलब्ध करून दिली. त्यासाठी वर्गात वाचनकोपरा बनविला.तेथे तार बांधून त्यावर विषयानुरूप वर्गीकरण केलेली सर्व पुस्तके टांगली. याला आम्ही नाव दिले "तरंगते वाचनालय " विद्यार्थ्यांना सुद्धा गटानुसार पुस्तके वाचनाची वेळ ठरवून दिली.मुलांनी वाचलेल्या पुस्तकांच्या नोंदी, शिकवण ,आपले पुस्तकांविषयीचं मत,पुस्तक परीक्षण लिहिण्यासाठी खास एक "पुस्तकमित्र" म्हणून वही सुद्धा केली. वाचनालयासाठी काही पुस्तके समाजसहभागातून मिळवली तर काहींनी सदिच्छा भेट दिली. आता मुले अतिशय आनंदाने आणि आवडीने वाचनात गुंग होताना दिसत होती.

माझ्या मैत्रिणीच्या गंगापूर गावातील नगरपालिकेच्या शाळेत सुद्धा हँगिंग लायब्ररी हा उपक्रम राबविण्याचे ठरवले. त्यासाठी त्या शाळेला मी माझ्या शाळेची TWINNING SCHOOL करण्याचे ठरवले. आणि त्याअंतर्गत या शाळेत सुद्धा हा उपक्रम यशस्वीपणे राबविला.

### दृश्य परिणाम

आमच्या वर्गात राबविलेला “तरंगते वाचनालय” (हँगिंग लायब्ररी) हा उपक्रम अपेक्षेपेक्षाही खूप जास्त चांगले परिणाम देऊन गेला. मुलांमध्ये वाचनाची गोडी प्रचंड वाढली. त्यांच्यात पुस्तके वाचनासाठी आता चढाओढ निर्माण होऊ लागली.वाचलेल्या पुस्तकांबद्दल ती चर्चा करू लागली.आपले विचार वक्तृत्व स्पर्धेत आत्मविश्वासाने व्यक्त करू लागली. तसेच नियमानुसार आधी शालेय क्रमिक पुस्तके वाचून मगच हि वाचनालयातील अवांतर पुस्तके दिलेल्या निश्चित वेळेतच वाचत होती. त्यामुळे शिस्त,नियम या गोष्टींचे त्यांच्याकडून आपोआपच पालन होऊ लागले.आणि जवळपास आमच्या वाचनालयातील सगळीच पुस्तके मुलांची वाचली गेली. याहून मोठे यश आणि आनंद तो कोणता एका शिक्षकासाठी . आमच्या वर्गाच्या या उपक्रमाचे अनुकरण करून शाळेतील प्रत्येक वर्गात आता हँगिंग लायब्ररी सुरु झाली आहे .एवढेच नव्हे तर माझी Twinning School असलेल्या गंगापूर गावातील मनपा शाळा येथेही हा उपक्रम यशस्वीपणे राबविला गेला असून विद्यार्थ्यांचा आनंद आणि गुणवत्ता वाढविणारा ठरला आहे. त्याचबरोबर नाशिकमधील इतर काही शाळांनी सुद्धा आमच्या या उपक्रमाचे अनुकरण करून

हा तरंगते वाचनालय हा उपक्रम आपल्या शाळेत राबविला. हि या उपक्रमाची यशस्वीताच म्हणायला लागेल.

**श्रीम. कुंदा जयवंत बच्छाव**

पद : उपशिक्षिका
शाळेचे नाव :नासिक महानगरपालिका
शाळा क्र.१८,आनंदवली,नासिक .
मोबाइल नंबर :९४२०६९५०६५)

# शैक्षणिक न्यूज

**दि. ८ मे २०२०**

प्रति,

- प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व
- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व

**विषय :- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जीवन शिक्षण मासिकाचा ई अंक शिक्षकांपर्यंत पोहचविणेबाबत ...**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रेसचे कामकाज बंद असल्याने जीवन शिक्षण मासिकाची छापील प्रत शाळांपर्यंत पोहचविणे सद्यस्थितीत अशक्य असल्याने, माहे एप्रिल 2020 चा जीवन शिक्षण मासिकाचा ई अंक आपणाला maa.ac.in वर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

याबाबतची माहिती आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहचविण्यात यावी.

**दिनकर पाटील**
**संचालक**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**

# कलामंच

### वर्षाचे बारा महिने

एका वर्षात आहेत
एकूण महिने बारा
कालगणती करण्याचा
हा खटाटोप सारा

वर्षाची सुरुवात होते
जानेवारीच्या महिन्याने
भारतीयात चैतन्य येते
प्रजासत्ताक दिनाने

फेब्रुवारी मार्च महिन्यात
सुरू होतो उन्हाळा
एप्रिल मे तळपती
जूनमध्ये पावसाळा

ऑगस्ट महिन्यात
येती अनेक सण
मन उल्हसित होते
पाहून स्वातंत्र्यदिन

सप्टेंबर महिन्यात येतो
संपायला पावसाळा
ऑक्टोबर नोव्हेंबर तर
दसरा दिवाळीचा मेळा

डिसेंबरचा महिना
येतो वर्षाच्या शेवटी
एक वर्ष सरले असे
सज्ज नव्या वर्षासाठी

**नासा येवतीकर**
विषय शिक्षक
कन्या शाळा धर्माबाद
9423625769

**सुट्टीत काय करू ?**

### विद्यार्थ्यांनो : खेळा...स्वतःला शोधा !

सुट्टीचा अतिशय उत्सुकतेने वाट पाहणाऱ्या माझ्या बालमित्रानो आपली बुद्धीमत्ता ओळखण्यासाठी आणि वाढविण्यासाठी काही खेळ दिले आहेत. ते खेळा .काही कृती करून बघा. इतरांची निरीक्षणं करा. योग्यप्रकारे टी. व्ही.चा वापर करून बघा.

(१) कोणतेही मैदानी खेळ खेळा.

(२) गायन, वादन,नर्तन यांपैकी जे आवडेल ते शिका.

(३) जोरात पळणे,संथ चालणे,सायकल अशा वेगवेगळ्या शर्यती लावा.

(४) व्यायाम करा.

(५) नाच करा.

(६) कलाकुसरीची कामे,हस्तकलेच्या वस्तू तयार करा.

(७) आपल्या गावात/सोसायटीत इतरांच्या मदतीने एखादा कार्यक्रम स्वतः आखा. उदा. स्वच्छता मोहीम /झाडं लावणं - झाडं जगवणं.

(८) आजी -आजोबांचे अनुभव ऐका. त्यांच्या लहानपणीविषयी,शाळेविषयी माहिती काढा.

(९) घरात बसून टी. व्ही. बघण्यापेक्षा बाहेर पडा.

(१०) पुस्तकांमध्ये खूप विविधता असते. सगळे प्रकार बघा. चरित्र, जादूच्या गोष्टी, विज्ञानविषयक, कविता इ.

(११) वाचलेल्या पुस्तकांविषयी कोणाशीतरी बोला.

(१२) छोट्या मुलांना जमवून गोष्टी सांगा.

(१३) शब्दकोडी,चित्रकोडी सोडवा. विविध भाषिक खेळ खेळा.

(१४) शक्य असल्यास नवीन भाषा शिका.

(१५) अंकांशी खेळा. फावल्या वेळात गणिती कोडी सोडवा.

(१६) घरातल्या खर्चाचं अंदाजपत्रक तयार करा. जमाखर्च लिहा.

(१७) लहानांना गणित शिकवा.

(१८) जेवढी झाडं,फळं,फुलं ओळखू शकता त्या सर्वांविषयीची माहिती देणारी वही तयार करा.

(१९) निसर्गातल्या सर्वच घटकांविषयी सादर होणारे कार्यक्रम डिस्कव्हरी चॅनलवर बघा.

(२०) बी लावा. तिचं रोप कधी येतं ते बघा. त्याची वाढ कशी होते,याचं निरीक्षण करा.

(२१) चित्र काढायला आवडत असेल तर बघून चित्र काढण्यापेक्षा मनाने चित्र काढा.

(२२) वाद्य वाजवायला आवडत असेल तर ते शिका.

(२३) आपल्या अभ्यासाचं मूल्यमापन स्वतःच करा.

**संकलन**

**शंकर सिताराम चौरे (प्रा. शिक्षक)**

जि.प.प्रा. शाळा बांडीकुहेर

ता. साक्री जि. धुळे

९४२२७३६७७५

# सुजाण पालकत्व

## पालक आणि मुले

कुटुंब ही मुलांची पहिली शाळा असते. आई ही त्याची पहिली शिक्षिका असते तर वडील त्याचे दुसरे शिक्षक. वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजे शिक्षणासाठी शाळेत जाण्यापूर्वी तो घरातच वावरत असतो. या वयात मुलांना चांगले काही ऐकायला आणि बघायला मिळाले तर आपले मूल नक्की बुद्धिमान होऊ शकते. खास करून आईने मुलांना नेहमी काही ना काही ऐकू घालावे. उदाहरण म्हणून आपण राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन विचारात घेता येईल. मा जिजाऊ यांनी बाल शिवाजी याना‍ा लहानपणी रामायण आणि महाभारत यातील शूरवीरांच्या गोष्टी सांगितल्या त्यामुळे राजे घडले. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांसाठी थोडा वेळ अवश्य काढावे. मुलांना असुरक्षित वाटणार नाही याची काळजी घ्यावी. कुटूंबातील वाद किंवा कलह मुलांच्या मनावर विपरीत परिणाम करत असतो. म्हणून कुटुंबात नेहमी प्रेमाचे आणि खेळीमेळीचे वातावरण असायला हवे.

आपण लावलेले रोपटे चांगले वाढावे म्हणून त्यास आपण नित्यनेमाने पाणी टाकतो. सूर्यप्रकाशात त्याची वाढ चांगली होते. मुलांच्या बाबतीत देखील असेच आहे. मुलांच्या निकोप वाढीसाठी आईने पाण्याचे काम करावे तर वडिलांने सूर्यप्रकाश व्हावे. वयाच्या दहाव्या वर्षेपर्यंत मुलांकडे विशेष लक्ष दिले की पुन्हा त्यांच्याकडे खास लक्ष देण्याची गरज भासत नाही. तेंव्हा नुकतेच पालक झालेल्या आई वडिलांनी ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे.


**नासा येवतीकर**

विषय शिक्षक,

कन्या शाळा धर्माबाद जि. नांदेड

9423625769

# बोधकथा

## व्यवहार ज्ञानाचे धडे

एका शहरात दररोज संध्याकाळी एक महात्मा प्रवचन देत असे. त्यांची ख्याती एका धान्याच्या व्यापा-यानेही ऐकली होती. तो आपल्या मुलासोबत प्रवचन ऐकण्यास आला. प्रवचन सुरु झाल्यानंतर दोघेही लक्षपूर्वक ऐकत होते. काही ज्ञानाच्या गोष्टी सांगत असताना ते म्हणाले,''या जगात जितके प्राणी आहेत. त्या सर्वांमध्ये आत्मा वावरत असतो.'' ही गोष्ट व्यापा-याच्या मुलाला हृदयस्पर्शी वाटली. त्याने मनोमन हा विचार आचरणात आणण्याचा संकल्प केला. दुस-या दिवशी तो एका दुकानावर गेला तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला काही वेळ दुकान सांभाळण्यास सांगितले. ते स्वत: दुस-या कामासाठी बाहेर निघून गेले. त्यानंतर काही वेळाने तेथे एक गाय आली. दुकानासमोर ठेवलेले धान्य खाऊ लागली. मुलाने त्या गायीला हाकलण्यासाठी लाकूड उचलले पण त्याच्या मनात विचार आला. गाय आणि माणूस दोघांनाही जीव आहे.मग भेदभाव का मानायचा? ती धान्य खात असेल तर खाऊ दे. तेवढयात व्यापारी तेथे आले त्याने गायीला धान्य खाताना पाहून मुलाला म्हणाले,'' अरे तुझ्यासमोर ती गाय धान्य खाते आहे? आणि तू आंधळा झाल्यासारखा गप्प बसून का आहेस? आपले किती नुकसान होते आहे याची काही कल्पना आहे की नाही? तिला हाकलून का दिले नाहीस?'' मुलगा म्हणाला,'' बाबा, काल तर महाराज म्हणाले की, सगळे जीव एकसारखे आहेत, मी गायीमध्ये पण एक जीव पाहिला'' तेव्हा व्यापारी म्हणाले,''मूर्खा, अध्यात्म आणि व्यापार यात गल्लत एकसारखे करायची नसते.''

तात्पर्य :- सारासार बुद्धीचा वापर करून जीवन जगल्यास जीवन सुखदायी होते.

**संकलन**
**प्रदीप मोहोड**
नागपूर

# ENGLISH CORNER

Dear adroit buddies,

A denunciated classroom necessitates a tremendous transaction of distinctive demeanor and perspective from that of a conventional classroom. These posture and countenance must be emblazoned by novices, teachers, and parents. The glimpse and ambience of the classroom solely will be awfully offbeat from that of a customary classroom. There are abundance enforced habitual activities and scenario for teachers to authenticate with the assimilation of students in order to spawn a characteristic learning environment for each adolescent to master and flourish to their adequate potential in. Here are essentially used instructions in the classroom. All dexterous teachers are requested to work with all these instructions in our classroom in order to establish ambience of English language. Our learners can get a glorious and favorable circumstances to listen more and more English. Using of these instructions regularly, the students perceive thoroughly. Consequently the pupils are able to practice these instructions in the akin situation in their day to day life. Listening is one of the most crucial steps in learning any language skills. Let's work with henceforth.

Attention.
Be silent.
Cool down.
Begin now.
Stand up.
Stand on left foot.
Stand on right foot.
Stand straight.
Don't sit down.
Sit down.
Sit straight.
Get up.
Get out.
Don't stand up.
Don't move.
Come here.
Come with me.
Go back to your place.
Have a seat.
Go there.
Come back.
Don't come here.
Don't go there.
Come in.
Come soon.
Go out.
Go straight.
Show me your hands.
Show me your right hand.
Show me your left hand
Close your eyes.
Open your eyes.
Open your mouth.
Close your mouth.
Touch your head.

Touch your hair.
Touch your head.
Touch your forehead.
Touch your eyes.
Touch your nose.
Touch your ears.
Show your teeth.
Touch the ground.
Show your tongue.
Raise your hands.
Raise your right hand.
Raise your left hand.
Stretch your hands.
Clap once.
Clap twice.
Clap thrice.
Show me your bag.
Open your bag.
Take your books out of your bag.
Count the books.
Put your books away.
Bring your English book.
Take your notebooks out of your bag.
Put your notebooks away.
Take your compass out of your bag.
Show me your compass box.
Open your compass box.
Show me your pen.
Give me your pen,
Take your pen
Put your pen away.
Show me your pencil.
Give me your pencil.
Take your pencil.
Put your pencil away.
Put pen and pencil in your compass box.
Close your compass box.
Put your compass box away.
Show your books.
Give me your books.
Take your books.
Open your book.
Open your book at page 10.
Read aloud.
Read silently.
Read with me.
Close your book.
Show your notebooks.
Give me your notebooks.
Take your notebooks.
Open your notebook.
Draw a circle.
Write your name.
Close your notebook.
Take it.
Keep quiet.
Keep silence.
Pay attention.
Help me.
Wait a minute.
Go ahead.
Knock the door.
Open the door.
Close the door.
Look here.
Look at me.
Look there.
Look ahead.
Note this down.
Stop.
Mind your language.
Wash your hands.
Answer the question.
Turn around.
Turn left.
Turn right.
Bend down.

Take a step.
Go back two step.
Come three steps forward.
Put your left foot forward.
Put your right foot backward.
Put your left foot backward.
Put your right foot forward.
Step to the left.
Step to the right.
Stand on the right foot.
Stand on the left foot.
Run on the spot.
Jump on the spot.
Jump on one leg.
Tap your feet.
Walk to the table.
Walk like a soldier.
Pick up the duster.
Clean the blackboard.
Wipe the blackboard.
Switch off the light.
Switch on the light.
Walk to the door.
Shut the door.
Latch the door.
Unlock the door.
Open the door.
Sharpen your pencil.
Ring the bell.
Stand in the queue.
Note this down.
Remove your shoes.
Comb your hair properly.
Recite the poem.
Put a mark.
Fill the missing letters.
Match the word.
Rewrite the sentence.
Stand behind the door.
Take a deep breath.
Nod your head.
Underline the sentence.
Form a line.
Get into a line.
Pay attention.
Listen carefully.
Bend over and touch your knees.
Move your head from side to side.
Put rubbish in the dustbin.
Push the desk.
Pull the chair.
Call him.
Sing a song.
Button up your shirt.
Switch on the TV.
Increase the volume.
Give me a glass of water.
Follow me.
Give me something to eat.
Go to bed.
Help me.
Brush your teeth.
Control yourself.
Cool down.
Take rest.
Believe me.
Try again.
Take care.
Come to the point.
Mind your language.
Tell me your opinion.
Bring it tomorrow.
Turn on the tap.
Turn off the tap.
Forgive me.
Plant trees.

Meet me tomorrow.
Take exercise daily.
Give up bad habits.
Dress neatly.

**Compiler**
**Mr. B. R. Chavan**
(Assistant Teacher)
K. L. Ponda Highschool, Dahanu
Tal- Dahanu, Dist.- Palghar 401601
Contact No- 8208009342

# जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट व उपक्रमशील शाळांची माहिती (लेखस्वरुपात)

1) शाळेचे नाव -
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फांगदर
2) पत्ता-मु पो. खामखेडा.
3) केंद्र- खामखेडा
4) तालुका – देवळा
5) जिल्हा – नाशिक
6) मुख्याध्यापकाचे नाव- संजय मालोजी गुंजाळ
7) फोन नंबर- 94 23 93 26 98
8) शिक्षक संख्या- 2
9) वर्ग – 4
10) माध्यम- मराठी
11) पटसंख्या - 46
12) शाळेचा मेल आयडी
khandumore34@gmail.com
zpschoolfanghdar@gmail.com
13) संगणक संख्या- सात
इंटरॅक्टिव्ह स्मार्टबोर्ड
प्रोजेक्ट
ॲन्ड्रॉइड व विंडोस ओप्रेटीग सिस्टीम
स्मार्टपॅनल

# खडकाळ माळरानावरील नंदनवन - फांगदर

जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झालाय असं म्हटलं जातं. मात्र, हे विधान सरसकट वापरणं किती चुकीचं आहे, हे आपणास फांगदर ता देवळा (नाशिक)येथील आदिवासी शेतमजुरांच्या शाळेस भेट देऊन आपल्याला स्पष्ट होईल.

मुलांच्या विकासासाठी झटणारी शाळा आणि मुलांसाठी जीव ओतून काम करणारे शिक्षक समाज त्याला करत असलेली मदत व ह्या मदतीतून जिल्हा व राज्याच्या नकाशावर झळकलेली शाळा आपणा समोर ह्या माध्यमातुन अनुभवायला मिळणार आहे .

समाज सहभागातून केला शाळेचा कायापालट

जिल्हा परिषद शाळाकडे समाजाचा बघण्याचा द्रुष्टीकोन नकारात्मक असतो. मात्र हा बदल करून दाखवला आहे.खामखेडा येथील फांगदर वस्तीवरील वस्तीशाळा शिक्षक खंडु मोरे म,संजय गुंजाळ वं आनंदा पवार या शिक्षकांनी.सोशियल माध्यमाच्या मदतीने डोंगराच्या पायथ्याशी खडकाळ माळरानावर वसलेले एका पूर्वाश्रमीच्या वस्तीशाळेळा आज राज्याच्या नकाशावर नेऊन ठेवन्यात ह्या शाळेच्या संस्थापक निमशिक्षक खंडु मोरे यांचा वाटा सिंहाचा आहे.

वस्तीशाळेचा प्रयोगशील शाळेपर्यंतचा प्रवास......

नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्याच्या शेवटच्या गिरणा नदीच्या काठावर कळवण,देवळा व सटाणा तालुक्याच्या हद्दीवर बसलेलं खामखेडा गावातील फांगदर ह्या शेतमजुरांच्या आदिवासी वस्तीवर वस्तीशाळा म्हणुन ही शाळा अठरा वर्ष्यापुर्वी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरनाच्या उदेशाने धरूया शिक्षणाची कास करुया वस्तीचा विकास ह्या शासनाच्या उदात्त धोरणातून वस्तीशाळा योजनेतुन २ जुलै २००१ रोजी अपुऱ्या भौतिक सुविधांच्या सहाय्याने पाचटाच्या झापात सुरु झाली.

खामखेडा गावापासुन ४ किमी अंतरावर असणारे फांगदर हि पंचविस ते तिस घरांची आदिवासी शेतमजुरी करणाऱ्या लोकांची लोकवस्ती.ह्या वस्तीवर शाळा सुरु झाली.२००८ पर्यंत हि शाळा पाचटाचा झाप ,खाजगी

कौलारू घर,कांदाचाळ,पत्र्यांचा शेड,खाजगी पत्र्यांची खोली अशा भौतिक सुविधांचा अभाव,अपुरी बैठक व्यवस्था असलेली शाळा अशी होती.२००८ मध्ये हि शाळा जिल्हा परिषदेकडे नियमित होईपर्यंतचा असाच प्रवास सुरु होता.

सर्व शिक्षा अभियानातून शाळेला टुमदार इमारत मिळाली.वस्तीजवळील उजाड माळरान सपाट करत टेकडीवर शाळेचे बांधकाम केले.उजाड माळरानावर बांधकाम केलेली ही शाळा आज दोघां शिक्षकांनी शाळा स्तरावर राबवलेल्या ज्ञानरचनावाद,क्षेत्रभेट उपक्रम,डिजीटल इंटरॲक्टीव क्लासरूम,औषधी बगीचा,सुंदर शैक्षणिक संकुल,विविध शैक्षणिक साहित्यातून अध्यापनाची गोडी,वाढदिवस समारंभ,विविध जयंती उत्सव,सामाजिक संस्था,देणगीदारांच्या योगदानातून विकास करत शाळा स्तरावरील विविध शैक्षणिक उपक्रम राबवल्याने फांगदर शाळेची ही एक वेगळी ओळख जिल्ह्यात उपक्रमशील शाळा म्हणुन निर्माण झाली आहे.

आदिवासी शाळेतच लोकसहभागातून खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांच्या तोडीस तोड देणारा दर्जा खंडु मोरे,संजय गुंजाळ व आनंदा पवार या शिक्षकांमुळे ह्या शाळेला मिळाला आहे.उपक्रम शिलतेच्या जोरावर राज्यातील कानाकोपऱ्यात ह्या शाळेचे नाव जाऊन पोहचले आहे.धरूया शिक्षणाची कास करुया वस्तीचा विकास ह्या ब्रिदवाक्य्यानुसार शाळेमुळे वस्तीचा विकास घडू लागला आहे.

नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील तिसरी व महाराष्ट्रातील पहिली आयएसओ मानांकन मिळवणांरी वस्तीशाळा ठरली आहे.शाळेत गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवले जातात.शाळेच्या विकासात खामखेडा ग्रामस्थ,विविध सामाजिक संस्था,समाजातील दानशुरांच्या सहाय्याने व शिक्षकांचा व पालकांच्या अथक परिश्रमातून राज्यभरातील समस्थ प्राथमिक शाळांना उर्जादाई असे कामकाज या आदिवासी वस्तीवरील शाळेने महाराष्ट्रा समोर उभे केले आहे.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन शाळेने प्रगत शाळा म्हणुन लौकिक मिळवला आहे.गुणवत्ता विकासात शाळेने माघील पाच वर्ष्यापासून सतत अ श्रेणीत स्थान पटकावले आहे.

उपक्रमशील शाळा

सतत राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांमुळे जिल्ह्यातील ‘उपक्रमशील शाळा’ असा नावलौकिक या शाळेने मिळवला आहे.पाच वर्षांपूर्वी गुणवत्ता विकासात शाळा ‘ड’ श्रेणीत होती.परंतु अवघ्या दोन वर्षांत शिक्षकांचे अथक प्रयत्न आणि लोकसहभाग यामुळे फांगदर शाळेने अंतर्बाह्य़ बदल घडवून आणत तिन वर्ष्या पुर्वी थेट आयएसओ मानांकनालाच गवसणी घातली आहे.

मुळात ही शाळा द्विशिक्षकी.परंतु शाळेचा हा कायापालट करण्यासाठी आपणास गुणवत्ता दाखवावी लागेल.यातुन शाळेचे शिक्षक खंडू मोरे आणि आनंदा पवार यांनी अपार प्रयत्नातुन शाळा गुणवत्तेत नावारुपास आणली.सध्या संजय गुंजाळ याचं देखील पाठबळ त्यांना लाभात आहे.

## लोकसहभागातून शाळेचा विकास

शाळेच्या प्रगतीत लोकसहभाग महत्त्वपूर्ण ठरला आहे.या शाळेत येणारा सर्व विध्यार्थ्यी वर्ग हा शेतमजुर आदिवासी बांधवांचा असतांना देखील शिक्षकांनी शाळेची गुणवत्ता सुधारली.गुणवत्तेच्या बळावर शाळेपर्यंत शिक्षकांनी समाजाला आणले.शाळेचे विविध उपक्रम सोशियल माध्यमातुन समाजापुढे आनु लागलेत.आज पावेतो शाळास्तरावर जवळजवळ पंधरा लक्षाहून अधिक लोक सहभाग जमा करत शाळा विकासासाचे उपक्रम राबवलेले आहेत.

कोणत्याही शासकीय मदतीविना शाळेने लोकसहभागातून एका वर्गात ‘ई लर्निंग’च्या माध्यमातून अध्ययन-अध्यापनाची सोय केली आहे.सहा संगणक,प्रोजेक्टर,साउंड सिस्टीम,इंटर अक्टीव स्मार्ट बोर्ड,एम्प्लीफायर,चोवीस तास विजेसाठी सोलर सिस्टीम यांसह आदर्शवत ईलर्निंग सुविधा एका आदिवासी वस्तीवर सुरु केली आहे.शेतमजुरांची मुल अतिशय अस्सलिखित पणे संगणक हाताळत ध्यापनात प्रभावीपणे वापर करत आहेत.

गुणवत्तेच्या बळावर समाजाकडून मदत

सुरवातीला प्रतिकुल परिस्थिती असतांना देखील शाळेची उपक्रमशीलता वं गुणवत्ता समाजमाध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचली व समाज शाळेला भेटी देण्यासाठी येऊ लागला.रमेश शिरसाठ,सुनिल पाटील,नानाजी मोरे,सी आर पाटील, दिपक भामरे त्याचबरोबर खामखेडा ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन शाळेला संगणक मिळाली आहेत.या योगदानामुळे आदिवासी विध्यार्थीनां आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे गिरवत आहोत.त्या नंतर अलका सुर्यवंशी पुणे ,विलास सुर्यवंशी मुंगसे ,देवळा डॉक्टर असोशियश,स्वप्निल अग्रो वडाळा,ह्या दात्यांच्या माध्यमातुन इतर गरजा पुर्ण करत राहिलो.

शाळेचे क्रीडांगणही लोकसहभागातूनच जेसीपीच्या सहाय्याने तयार झाले आहे.ग्रामस्थ उमाजी देवरे, संजय बच्छाव , प्रभाकर शेवाळे या गावातील शेतकऱ्यांनी स्वखर्चातून चारशे फुटावरून शाळेसाठी तर पन्नास हजाराहून अधिक भरीव मदतीचे योगदान दोहा,कतार या देशातून रविंद्र आहेर,अंगोला देशातील दीपक भामरे यांच्या मदतीतुन ८०० फुटावरून तिनइंची पाईप लाईन संजय बच्छाव या शेतकऱ्याच्या स्वत:च्या विहिरीवरून जलवाहिनी उपलब्ध करून दिली आहे.त्याच बरोबर शालेय आवारात शालेय कमान तयार करून दिली आहे.

शाळा रंगरंगोटी,औषधी बगीचा,सुंदर शैक्षणिक संकुल,साहित्य निर्मिती,पाण्याची व्यवस्था,हातपंप,शालेय आवारात पाच लक्ष खर्च करत फेवर ब्लॉक,नाशिक येथील विविध उद्योगात कार्यरत असलेल्या युवकांनी दीड लक्ष किमतीची सोलर सिस्टीम शाळेचे उपक्रम पहात शाळेला मदत दिली आहे.

शाळेची गुणवत्ता ,शाळा स्तरावरील विविध नाविन्यपुर्ण उपक्रम समाजाला दाखवत आम्ही शिक्षकानी भौतिक सुविधांची पुर्तता करत शाळेचा विकास घडवला आहे.सध्या शाळेचे एक हजार हुन अधिक ग्रंथ संपदा असलेले वाचनालय सुरु आहे.

**हिरवाईने नटलेली शाळा**

शालेय आवारातील वृक्षसंपदा व शाळेचे मनोहारीरूप शाळेत येणाऱ्या सर्वांनाच भुरळ घालते. टेकडीच्या माथ्यावर टुमदार अशी शाळेची इमारत आकर्षक रंगरंगोटीने लक्ष वेधून घेते.आज तालुक्यातील सर्वात स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून फांगदर शाळेकडे पाहिले जाते.पिण्यास देखील पाणी मिळणे मुश्कील असलेल्या ठिकाणी खडकाळ माळरानावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळा हिरवाईने नटवली आहे.

शिक्षकांनी शालेय आवारात तीनशेपेक्षा अधिक झाडे लावली आहेत.त्यात बेचाळीस औषधी वनस्पतींचा बगीचा शाळेने विद्यार्थ्यांच्या मदतीने तयार केला.हिरडा ,बेहडा,जायफळ,कोरपड,आनंद,जयपाल,आव ळा,तुळस,रिठा,निंब,वड,अश्वगंधा,यासह जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील पहिली औषधी बगिचा असलेली शाळा शिक्षकांनी प्रतिकुल परिस्थितीत निर्माण केली आहे.

शालेय आवारातील प्रत्येक वृक्षास शिक्षकांनी नावे दिली आहेत.त्यामुळे विध्यार्थ्यांना वृक्षांची ओळख होत असते.या शिवाय कार्यालयात कार्पेट,प्रत्येक वर्गातील खिडक्यांना पडदे,विद्यार्थी-शिक्षकांना ओळखपत्र यामुळे ही आपले वेगळेपण

असलेली शाळा म्हणून नावारुपास आली आहे.शालेय आवारात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी झाडांवर बाटल्यांच्या साहाय्याने सुविधा केली आहे.त्यामुळे चिमणी, साळुंखी, कावळे यांसह विविध पक्ष्यांचा किलबिलाट शालेय आवारात सतत ऐकू येतो.

तालुक्यातील पहिली डिजिटल ईलर्निंग शाळा

तालुक्यातील पाहिली डिजिटल ईलर्निंग शाळा म्हणून फांगदर शाळेचा लौकिक आहे.संगणक, इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टरवर शाळेत अध्यापन केले जाते.आदिवासी शेतमजुरांची मुल अध्यापन करत असतांना ह्या साधनांचा कुशलतेने वापर करतात.ई-लोनग सुविधा शाळेत आदिवासी वस्तीवरील विद्यार्थी टॅबलेटच्या साहाय्याने शिक्षण घेत असल्याचे परिसरात मोठे अप्रूप आहे.

तंत्रस्नेही साधनांचा प्रभावी वापर करत शाळेतील चौथीतील मुले पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन स्वत: तयार करतात.शाळेतील पहिली पासुन विध्यार्थी संगणक हाताळत असल्याचे विधायक चित्र ह्या शाळेवर पहावयास मिळते.शिक्षकांनी विविध शैक्षणिक व्हीडीओस तयार केले असुन शाळेचा स्वतंत्र ब्लॉग आहे. सॉफ्टवेअरच्या माध्यमातुन विध्यार्थी पाठ्यक्रम पुर्ण करत आहेत.ह्या साधनांचा अध्यापनात वापर होत असल्याने विध्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता वाढ झाली आहे.

झी २४ तास वाहिनीने केलेली यशोगाथा खालील लिंक द्वारे आपण पाहू शकतात. **https://youtu.be/XC1G4pSFlPQ**

क्षेत्रभेटीला महत्त्व

अध्ययन व अध्यापन प्रक्रिया विविध उपक्रमांच्या माध्यमांद्वारे फांगदर शाळेत रंजक बनविण्यात आली आहे.पारंपरिक ‘खडू फळा’ या पद्धतीसह क्षेत्रभेट उपक्रमातुन चार भिंतींच्या आड मिळालेले ज्ञान बाहेरील जगाशी जोडणे हा उद्देश ठेवत घोकंपट्टी पद्धतीच्या शिक्षणापासून विद्यार्थ्यांची सुटका करण्यासाठी त्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त केले जात आहे.कधी टेकडीवर, कधी उघडय़ा मैदानावर विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या उद्देशाने नेऊन विद्यार्थी व शिक्षकांमधील अनामिक भीती दूर कशी होईल, ते शिक्षक पहात असतात.

नदी, घाट, लघु उद्योग, बायोगॅस प्रकल्प, आदर्श आधुनिक शेती, प्राथमिक आरोग्य केंद्र, टपाल कार्यालय, बँक, वीटभट्टी, कुक्कुटपालन उद्योग, साखर कारखाना, पोलीस ठाणे अशा अनेक ठिकाणी शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या आहेत. क्षेत्रभेटीमुळे अभ्यासक्रमात असलेल्या अनेक गोष्टी समजून घेण्यास विध्यार्थ्यांना मदत होते. या शिवाय विद्यार्थ्यांच्या माहितीतही भर पडते.

विध्यार्थ्यांना चाकोरी भाहेर पडत अध्यापन करतांना सुलभता व सहजता अनुभवास येत असल्याने सहज शिक्षण यातुन निर्माण होत असते.शिक्षकांच्या धडपडीमुळे व ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळेचा इथपर्यंतचा विकास घडून आला आहे.ही शाळा म्हणजे शिक्षण विभागासाठी भूषण असल्याची जिल्हा परिषदेचे शिक्षण व लोकप्रतिनिधींच्या शाळा भेटी दरम्यानच्या प्रतिक्रिया शाळेविषयी सर्व काही सांगून जाते.

**दप्तरमुक्त शनिवार**

शालेय वेळेत विद्धार्थी अनेक शैक्षणिक उद्धीष्ट पूर्ण करत असतात.त्यामुळे सर्वांगीण विकासाचे अनेक बाबी ह्या नियोजनात असतांना देखील माघे पडतात.त्यामुळे शैक्षणिक घटक पूर्ण करण्यासाठी नेहमी शिक्षकांनां कसरत करावी लागत असते.विध्यार्थी सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांबरोबरच कवायत,व्यायाम,योगासने,प्राणायाम,ईलर्निंग साहित्याचा अधिक वापर,ज्ञानरचना वादी

साहित्य ,विविध साहित्य खेळ ह्या बाबी माघे राहतात.ह्या सर्व बाबी आम्ही दर शनिवारी प्रभावीपणे राबवत असतो.ह्या दिवशी मुलांच्या दप्तराला सुट्टी असते.मागील शैक्षणिक वर्ष्यात दप्तर मुक्त शनिवारी सर्व उपक्रम प्रभावीपणे राबवत असल्याने शनिवारची उपस्थिती शंभर टक्के टिकवुन ठेवण्यात यश आले आहे.

### सोशियल मीडियाचा वापर

जिल्ह्यातील शाळेचा http://khandumore34dreamsschool.blogspot.in/ ब्लॉग असणारी पहिली शाळा फांगदर आहे.त्याच बरोबर शिक्षकांनी स्वतःचा ब्लॉग तशेच khandumore शैक्षणिक युट्युब च्यायनल तयार केले असुन अनेक शैक्षणिक साहित्य ह्या ठिकाणी पहावयास मिळते.शाळेचा नावाचे zpschoolfhangdar या नावाने फेसबुक पेज केले असल्याने शाळेचे विविध शैक्षणिक उपक्रम नेहमी शिक्षक सोशियल माध्यमातुन झळकवत असल्याने शाळेचे विविध उपक्रम राज्यभर राबवले जात आहेत.
शालेय वस्तु भांडार

शाळेत येणाऱ्या विध्यार्थींची परिस्थिती हलाकीची आहे.त्यामुळे व वस्तीवर शालेय गरजा पूर्ण होतील अशी व्यवस्था नसल्याने आम्ही शिक्षकांनी शाळेत वस्तु भांडार तयार केले आहे.ह्या वस्तु भांडारात विध्यार्थ्यांना पेन,पेन्सिल,वह्या,रंग,तशेच शालेय शैक्षणिक साहित्य नां नफा नां तोटा या तत्वावर मिळते.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गरजा शाळेतच पूर्ण होतात.याचा हिशोब शाळेतील विध्यार्थी ठेवत असल्याने विध्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान शाळेतच मिळत असल्याने विध्यार्थ्यांचे हे वस्तु भांडार कौतुकाचा विषय ठरले आहे.

### शिक्षणाची वारी

शाळांच्या गुणवत्ता विकासासाठी आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या सक्षमीकरणासाठी शालेय शिक्षण विभागाने'शिक्षणाची वारी'चे आयोजन केले होते.जळगाव येथील बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मैदानात या वारीचे २९ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत या वारीत शिक्षण क्षेत्रातील नवनवीन प्रयोग पाहण्याची संधी मिळाली.
शाळा विकास आराखडा व शाळा व्यवस्थापन समिती संरचना, पालकांची शाळांना अध्यापनात कौशल्य विकासात मदत, किशोरवयीन आरोग्य शिक्षण, पटसंख्या वाढीचे उपाय, लोकसहभाग, शालेय पोषण आहार, स्थलांतरित व शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी समितीचा सहभाग,दिव्यांग मुलांसाठीचे शिक्षण, गणित व भाषा वाचन विकास, कृतियुक्त विज्ञान, तंत्रज्ञानाचा अध्यापनात प्रभावी वापर, कला, कार्यानुभव व क्रीडाविषयक उपक्रम या वारीत अनुभवायास मिळालेत.ह्या वारीत आमच्या जिल्हा परिषद फांगदर(खामखेडा) शाळेचा लोकसहभागातून शाळा विकास हा स्टॉल लावण्यात आला होता. ह्या दालनास तिन दिवसात एक लक्षाहून अधिक लोकांनी भेट दिली हि बाब ह्या छोट्याश्या शाळेला अभिमानाची राहिली.
अनेक शाळांची आमच्या शाळेला भेटी......
माघील वर्ष भरात अनेक शाळातील असे दहा हजारहुन अधिक शिक्षक शिक्षणप्रेमी,अधिकारी,पदाधिकारी ,शाळा व्यवस्थापन समिती,सदस्य,ग्रामस्थ,विध्यार्थी शाळेस भेट देऊन शाळेने विध्याथीं गुणवत्ता व उपस्थिती वाढीसाठी राबवलेले उपक्रम समजून घेत आहेत.माघील वर्षी चांदवड देवळा मतदार संघाचे आ डॉ राहुल आहेर यांनी स्वतः भेट देत शाळेचे विविध उपक्रम जाणुन घेतले.ही बाबशाळा,वस्ती व गावासाठी अभिमानाची बाब आहे.

आत्ता पर्यंत दीडशेहुन अधिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष,सद्ष्य अकरा शाळांनी आमच्या शाळा पर्यंत सहली आणत तिन हजाराहुन अधिक विध्यार्थ्यानी आमच्या शाळेला सहलीच्या निमित्ताने भेट दिली आहे.

हवाई सफर,शिक्षणमंत्र्यांशीही संवाद.......

घरी अठरा विश्व दारिद्रय...भाकरीच्या चंद्राची भ्रांत त्यामुळे विमानप्रवास तर सोडाच घरातील कुणी साधे विमानही पाहिलेले नाही,काहींचे आई-वडील शेतमजुरीचे काम करून संसाराचा गाडा चालवतात तर बाकी शेती करून उदरनिर्वाह करतात. मुलांनी तर अजूनपर्यंत जिल्ह्याचे ठिकाणही पाहिलेले नाही. अशा घरातील आणि तेही वस्तीशाळेत शिकणाऱ्या २४ मुलांनी थेट विमानाने नाशिक ते मुंबई असा विमानप्रवास तर केलाच, शिवाय शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी बातचितही केली आणि नंतर मुंबई दर्शनही केले.

खेड्यातील शाळांमध्ये सहलीचे नियोजनही विद्यार्थ्यांना परवडेल अशाच पद्धतीने केले जाते. फांगदर येथील विविध उपक्रम राबविणाऱ्या शाळेने यावेळी आपल्या विद्यार्थ्यांना थेट विमानातून सफर घडविण्याचे ठाणले. शिक्षक संजय गुंजाळ, खंडू मोरे व आनंदा पवार यांनी याबाबतचा प्रस्ताव पालक आणि शिक्षण समितीसमोर ठेवला. आपली नाही तर निदान मुलांची तरी विमानप्रवासाची हौस फिटेल यासाठी पालकांनीही मोठ्या कष्टाने सहा महिने पैशांची जमवाजमव केली.

अखेर ठरल्याप्रमाणे सर्व नियोजन झाले आणि दि.७ मार्च २०१९ रोजी विद्यार्थ्यांनी नाशिक येथून विमानाने मुंबईकडे झेप घेतली.

या मुलांनी मुंबईत राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या सेवा सदन निवास्थानावर यांची भेट घेतली.

शिक्षण मंत्री मा विनोद तावडे साहेबांनी विद्यार्थ्यांची शाळा घेतली.विद्यार्थ्यांना विमान प्रवासाबद्दल अनुभवी विचारत कुठून विमान प्रवास केला.तुमची शाळा कशी आहे.तुम्हाला तुमच्या शाळेत काय बदल हवा आहे.इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना त्यांची कविता दुसरी आणि तिसरी च्या विद्यार्थ्यांना देखील कविता म्हणायला लावल्या.पहिलीतील विद्यार्थ्यांना त्यांना आवडणाऱ्या गोष्टी जाणून घेतल्या. शाळा व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शाळेचे शिक्षणाच्या वारीची यशोगाथा व छोट्यांच्या मोठ्या गोष्टी हे शिक्षक खंडु मोरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मंत्री मा विनोद तावडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याचे विधान भवन भेट दिली विधानभवनाच्या आमदारांचे आसन तसेच विधान भवनातील कामकाजाचे सविस्तर माहिती जाणून घेतली त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याच्या मंत्रालयात भेट दिली गेट ऑफ इंडीया त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जल वाहतुकीच्या देखील अनुभव यावा यासाठी विद्यार्थ्यांना जहाजावरून देखील शिक्षकांनी भेट घडवून आणते

वस्तीवरच्या या विद्यार्थ्यांना हा नवा अनुभव होता. त्यांना एक नवे जग पहायला मिळाले. या सहलीचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसला.विशेष म्हणजे चोवीस विध्यार्थ्यापैकी नऊ विद्यार्थ्यांचे पालक रोजंदारीने कामाला जाणारे शेतमजुर आहेत व इतर शेतकऱ्यांची मुले आहेत.

डिझाईन फॉर चेंज उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर निवड

डिझाईन फॉर चेंज या उपक्रमात नुकताच शाळेचा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला.विद्यार्थ्यांना शाळेत येणाऱ्या अडचणींची सोडवणूक विद्यार्थी स्वत:करतात अशा ह्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारातून वाहून जाणारे पावसाच्या पाण्याची विल्लेवाट योग्यरीत्या लावत हे पाणी बोरवेल मध्ये सोडल्याने हा बोरवेल पुन्हा सुरू केला या उपक्रमाचे राष्ट्रीय स्तरावर शंभर शाळांमध्ये निवड झाली.

वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमातून या शाळेने लोकसहभाग देखील मिळवला आहे.

शालेय शैक्षणीक उपक्रमांसोबत शाळेने सामाजिक बांधिलकीही जोपासली आहे.समाजाशी संपर्क ठेवत शाळेने माघील वर्षभरात शाळा विकासासाठी वस्तु तशेच निधीच्या स्वरुपात मोठ्याप्रमाणावर शैक्षणिक उठाव मिळवला आहे. “शाळेला गावाचा आधार असावा,व गावाला शाळेचा अभिमान वाटावा''अश्या प्रकारे येथील पालक,ग्रामस्थ ,सामाजिक संस्था ,लोकप्रतिनिधी व मुख्या संजय गुंजाळ व खंडू मोरे या शिक्षकांच्या अथक प्रयत्नातुन एका पाचटाच्या झापात भरणारी शाळा राज्याच्या नकाशावर उपक्रमातून झळकली आहे.समाजाच्या सुंदर समन्वयातून शाळेचा विकास घडत आहे.

## चर्चेतले चेहरे-१



**लव अग्रवाल**

सहसचिव

आरोग्य मंत्रालय,नवी दिल्ली

भारतात कोरोना प्रादुर्भाव झाल्यापासून जवळपास रोजच कोरोना संदर्भात सद्यस्थिती,आकडेवारी व सरकारी पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नांना आत्मविश्वासाने माध्यमांसमोर मांडणारा एक ४८ वर्षीय चेहरा सगळ्या देशाचे लक्ष वेधून घेत आहे.त्या विलक्षण व प्रभावी चेहऱ्याचे नाव आहे लव अग्रवाल.आजच्या पहिल्या पुष्पात माहिती करून घेणार आहोत ह्या अवलियाबद्दल.

लव यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९७२ चा.उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील रहिवासी असणारे लव यांनी IIT दिल्ली येथून मेकॅनिकल इंजिनीयरींग पूर्ण केलेले असून १९९६ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत ते आंध्र प्रदेश केडेरमध्ये दाखल झाले.आंध्र प्रदेशात माध्यमिक शिक्षण विभागाचे निदेशक तसेच स्वास्थ व परिवार कल्याण विभागाचे म्हणून त्यांनी भरीव काम केले.innovative अधिकारी म्हणून ते अधिकारी वर्तुळात प्रसिद्ध आहे.तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापरातुन आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल आणण्यावर लव यांनी विशेष मेहनत घेतली आहै.

नोकरशहांविषयी समाजमनात असणारे भलेबुरे समज खोटे ठरवत आपल्या कार्यक्षेत्रात पब्लिक सर्विसेसला चौकटीपलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने मानवीय करणाऱ्या लव यांनी २०१६ मध्ये केंद्रात जाण्याची इच्छा व्यक्त केली.आपल्या कार्यक्षमतेच्या जोरावर त्यांना हे शक्य झाले.२८ ऑगस्ट २०१६ पासून ते आरोग्य मंत्रालयाच्या संयुक्त सचिव पदी नियुक्त झाले.Global health,mental health

आणि तंत्रज्ञान ही जबाबदारी यथार्थपणे सांभाळणारे लव अग्रवाल यांनी आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.प्रभावी व्यक्तीमत्व व सकारात्मक देहबोलीसोबत कमालीची सहजता या जोरावर जी २० देशांच्या हेल्थ वर्किंग संमेलनात लव यांनी आयुष्मान योजनेचे प्रभावी सादरीकरण केले.आरोग्य क्षेत्रातील इतर देशांसोबत झालेल्या करारांत लव यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

लोकांवर विश्वास ठेवताना पुरेसा वेळ घेणारे लव चर्चेपेक्षा कृतीत आनंद घेणारे व्यक्तीमत्व आहे.कठोर शिस्तीसाठी ओळखले जाणाऱ्या लव यांना योगासनांची आवड असून कोरोना क्रायसिसपासून रोज १५ ते १६ तास अथक काम करणारे लव आदर्शवत आहे.आपल्या संकल्पनांच आरेखन करुन त्या पूर्णत्वास नेण्यासाठी कनिष्ट पातळीवर असणाऱ्या टीम सदस्यांकडूनही सूचना घेण्यात कमीपणा न घेणारे लव यांचा हा स्वभाव सगळ्यांना आवडतो.डिजीटल हेल्थ क्षेत्रातील जागतिक विचारांपुढे लव भारताचा प्रभावी चेहरा बनून पुढे आलेत.

रोज माध्यमांना सामोरे जाताना शब्द न शब्द जपून वापरणारे लव अतिशय आत्मविश्वासपूर्वक आकडेवारी सादर करतात.मरकज सारख्या वादग्रस्त घटनांवरही अतिशय संयत प्रतिक्रिया देत परिस्थितीचं गांभीर्य कमी होऊ न देता नेमकेपणावर बोट ठेवण्याची त्यांची कला नक्कीच वाखाणण्याजोगी आहे.सरकारी पातळीवर उपाययोजनांची माहिती देताना प्रसंगी सरकारचा बचाव आणि रणनिती सादर करताना सव्वाशे कोटी जनतेला सातत्याने आश्वस्त करतात हेच अत्यंत विलक्षण आहे.लव अग्रवाल यांच्यासारखे नोकरशहा प्रशासकीय पातळीवर काम करताना सामान्यांच्या मनातही घर करून जातात.

**गजानन उदार**
नाशिक

## AUDIO-VIDEO LAB



'माझं घर-माझं अभ्यासकेंद्र'

**My Home -My Learning Center**

(आपल्या घराला बघण्याचा नवीन दृष्टिकोन)




**मराठी व्याकरण!! भाषा अध्यापनशास्त्र.**









**ऑडिओ ऐकण्यासाठी क्लिक करा.**

---

**संपादक**
आनंद आनेमवाड
**उपसंपादक**
गोविंद सोनपिर
**सहसंपादक**
भागवत केंद्रे
**मार्गदर्शक**
संतोष भोंबळे
**तांत्रिक संपादक**
श्याम कापसे

---

सदरील इ- साप्ताहिकातील माहितीशी संपादक व इतर सहकारी सहमत असतीलच असे नाही. हि माहिती वेगवेगळ्या माध्यमातून संकलित केलेली असून त्यानं एकत्रित आणून सदरील साप्ताहिक PDF रूपात प्रसिद्ध केलेले आहे.

---